महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकरीता निधी
<u>वितरीत करण्याबाबत.</u>

महाराष्ट्रशासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.बांबू-२०१७/प्र.क्र.२१०/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १४ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u> :- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७.
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.०६.२०१७ व दि.०८.०८.२०१७
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.७३(बांबू मंडळ)/२१२/१७-१८, दि.९.५.२०१७.
४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय समक्रमांकित दिनांक १९.०५.२०१७
५) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८

<u>प्रस्तावना :-</u>

सन २०१७-१८ करिता "महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापना" (२४०६A१८५) या योजनेकरिता एकूण रु.१९४.९७ लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. सदर अर्थसंकल्पित निधीच्या अनुषंगाने रु.१९४.९७ लक्ष रक्कमेचा चालु प्रस्ताव संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला होता.

प्रस्तुत प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्र.१ व २ च्या वित्त विभागाच्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ वर्षाकरीता महसूली खर्च शीर्षांतर्गत योजनांकरिता ८०% मर्यादेत उद्दीष्ट निहाय रु.१५५.९८ लक्ष निधी वितरीत करण्याकरिता संदर्भाधिन क्र.४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

आता वित्त विभागाने संदर्भाधिन क्र.५ दिनांक ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ या उर्वरीत कालावधी, वितरीत निधी व त्याचा झालेला विनियोग पाहता, महसूली लेख्यातील अनिवार्य खर्चाच्या बाबीवर अर्थसंकल्पीय निधी खर्च करण्याची मर्यादा ९० टक्के तसेच उर्वरित इतर सर्व बाबींवरील (महसूली कार्यक्रम खर्च / भांडवली अनिवार्य व कार्यक्रम खर्च) खर्चाची मर्यादा ८० टक्के एवढी विहित करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त या आर्थिक वर्षाच्या उर्वरीत कालावधीसाठी ०१-वेतन, ०२-मजूरी, ०४-निवृत्तीवेतन विषयक खर्च, ०६-दूरध्वनी, विज व पाणी शुल्क, १४-भाडेपट्टी व कर, १९-आहार खर्च, २२ शस्त्रे व दारुगोळा, २४-पेट्रोल, तेल व वंगण, ३४-शिष्यवृत्ती व विद्यावेतन, ३६-सहायक अनुदाने (वेतन), ४५- व्याज, ५५-कर्जे व आगाऊ रकमा व ५६-कर्जाची परतफेड यासाठीच्या अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत तरतूदीचा उर्वरीत संपूर्ण निधी पूर्वीच्या

पध्दतीने एकत्रितरित्या वितरीत करण्यात येत आहे. म्हणजेच यासाठी आता १००% तरतूदी उपलब्ध राहील, अशी सहमती दर्शविली आहे. त्याअनुषंगाने प्रस्तावांतर्गत उर्वरित निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

वित्त विभागाच्या दि.०६.०२.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये, सन २०१७-१८ या उर्वरीत कालावधी, वितरीत निधी व त्याचा झालेला विनियोग पाहता, महसूली लेख्यातील अनिवार्य खर्चाच्या बाबीवर अर्थसंकल्पीय निधी खर्च करण्याची मर्यादा ९० टक्के तसेच उर्वरित इतर सर्व बाबींवरील (महसूली कार्यक्रम खर्च / भांडवली अनिवार्य व कार्यक्रम खर्च) खर्चाची मर्यादा ८० टक्के एवढी विहित करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने, संदर्भ क्र.३ येथील दि.०९.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता “महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापना” (२४०६A१८५) या लेखाशीर्षाअंतर्गत वित्त विभागाच्या सुचनांनुसार (०१-वेतन रू. ६.६३ लक्ष, ०२-मजूरी रू.१२.८७ लक्ष, १३-कार्यालयीन खर्च रू. ३.५१ लक्ष, १४- भाडेपट्टी व कर रू. २.३४ लक्ष, २६- जाहिरात व प्रसिध्दी रू. २.६३ लक्ष, २७-लहान बांधकामे रू. ०.८७, २८-व्यावसायीक सेवा रू.१.५६ लक्ष) रू. ३०.४१ लक्ष (रुपये तीस लाख एक्केचाळीस हजार फक्त) इतका निधी (२४०६ ०५१४) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

२. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. मागील वर्षी सदर योजनेकरिता वितरित केलेल्या निधीच्या विनयोगाबाबतचे प्रमाणपत्र सादर केले जाईल याची दक्षता घ्यावी.

४. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे. वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतच्या तरतूदीचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

५. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकते नुसार आहरण करावे.

६. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

सदर योजनेवर होणारा खर्च मागणी सी-७, प्रधान शिर्ष २४०६, वनीकरण व वन्यजीवन, १०५ वनोत्पादने, ०१ शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन, (०१) (०८) महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापना (२४०६ A१८५) या लेखा शिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यांत यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ मधील भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१४१६१३०६२५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.02.14 16:16:36 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर.
४. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
५. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
६. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
७. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)